अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. ०३ जुलै २०२५ | वर्ष १० वे | अंक ४७ वा | ब्रम्हपुरी | पाने ६ | किंमत २ रूपये

## ब्रम्हपुरीचे झाले चिखलगांव : न.प.चे ढिसाळ नियोजन

ब्रम्हपुरी/प्रतिनिधी

तालुक्यात चिखलगांव नावाचे गांव वैनगंगा नदी किनारी वसले आहे. नगर परिषद प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे नवीन चिखलगांव उदयास येत आहे. ब्रम्हपुरी शहराचे नवीन नामकरण म्हणजे चिखलगांव. सर्वत्र चिखल पसरलेले गांव म्हणजे ब्रम्हपुरी. समाजाच्या सर्व स्तरातून चिखलफेक होत असली तरी न.प. प्रशासन मात्र मूक गिळून गप्प आहे. प्रशासन संवेदनाहिन झाल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.





पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील सर्व प्रभागातील रस्ते, नाल्यांची सफाई करणे अपेक्षित होते. मात्र, तसे झाल्याचे अजिबात दिसत नाही. त्यातच भूमीगत गटार योजनेमुळे सर्वत्र रस्त्यांची तोडफोड झाली आहे. खोदकामामुळे रस्त्यावर माती पडली आहे. तसेच माती नाल्यांमध्ये गेल्याने नाल्यासुध्दा तुंबल्या आहेत. सांडपाण्याचा निचरा होणे अशक्य झाले आहे. सांडपाणी रस्त्यावर वाहू लागले आहे.

भूमीगत गटार योजनेचे खोदकामातील रस्त्यावर पसरलेली माती आणि पावसाचे पाणी तसेच नाल्या तुंबल्यामुळे रस्त्यावर आलेले सांडपाणी यामुळे शहरातील विविध प्रभागातील रस्ते चिखलमय झाले आहे. रस्त्यावरून चालणे किंवा वाहन चालविणे म्हणजे अपघाताला आमंत्रण, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

शहरात प्रियदर्शनी चौक ते भूतीनाला पर्यंत राष्ट्रीय महामार्गाचे बांधकाम सुरू आहे. त्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला नाली बांधकाम होत आहे. नाल्या अधिक उंच केल्याने, लगतच्या ले-आऊटमधील सांडपाण्याचा

(उर्वरित पान क्र. ५ वर)

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विषमतामुक्त गौरवशाली भारताच्या निर्माणाचा संकल्प - आम. सुधीर मुनगंटीवार

### ब्रम्हपुरी येथील 'विकसित भारत २०४७' प्रोफेशनल मीट कार्यक्रमात साधला संवाद

ब्रम्हपुरी/का.प्र.

'राष्ट्र सर्वोपरी हा विचार घेऊन देशगौरव पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी २०१४ साली जबाबदारी सांभाळली आणि गेल्या अनेक वर्षांमध्ये जे होऊ शकले नाही ते फक्त अकरा वर्षांमध्ये करून दाखवले. त्यांनी पुढच्या अनेक दशकांचा विचार केला. देशाला स्वातंत्र्य मिळून शंभर वर्षे पूर्ण होतील त्यावेळी माझा भारत कसा असेल याची तयारी आज



सुरू केली. २०४७ पर्यंत विषमतामुक्त, भयमुक्त, नक्षलमुक्त आणि त्याचवेळी रोजगारयुक्त, समतायुक्त, समरसतायुक्त गौरवशाली भारताच्या निर्माणाचा संकल्प केला, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

ब्रम्हपुरी येथे आयोजित 'विकसित भारत २०४७' प्रोफेशनल मीट या कार्यक्रमाला आम. मुनगंटीवार यांची उपस्थिती होती. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला माजी खासदार अशोक नेते, माजी आमदार अतुल देशकर, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीष शर्मा, महिला जिल्हाध्यक्ष वंदना शेंडे, रामजी लाखिया, प्रज्वलंत कडू, प्रा. शेख सर, अरुण शेंडे, अरविंद नंदूरकर, प्रा. प्रकाश बगमारे, श्रीराम पाटील डोंगरवार, तनय देशकर, मनोज भूपाल, गौरव भैया, साकेत भानारकर, रामलाल दोनाडकर, मनोज वाठे, सुयोग बालबुधे, ज्ञानेश्वर दिवटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार मुनगंटीवार म्हणाले, '२६ मे २०१४ रोजी जनतेच्या आशीर्वादाने स्वत:ला प्रधानसेवक ही उपाधी लावणारे देशगौरव श्री. नरेंद्रजी मोदी देशाचे पंतप्रधान झाले. ९ जून २०२४ ला तिसऱ्यांदा लोकांनी आशीर्वाद दिला. जनतेसाठी आम्ही काय करतोय आणि आमचा संकल्प काय आहे, हे विविध उपक्रमांच्या माध्यमातून मोदीजींनी देशाला सांगितले. त्यांनी हजारो कामे केलीत. पण संपूर्ण देशात देशभक्तीचा विचार जागृत केला, हे मला सर्वाधिक वैशिष्ट्यपूर्ण काम वाटते. देश एक आहे, राष्ट्र सर्वोपरी आहे, अशी भावना प्रत्येकात निर्माण केली. माझ्यादृष्टीने त्यांच्या प्रत्येक कामाचा केंद्रबिंदू राष्ट्रभक्ती आहे. 'मै देश नहीं झुकने नहीं दुंगा' हा त्यांचा भाव विकासाचा केंद्रबिंदू आहे.'

मोदींच्या काळात अकरा वर्षात बजेट ५० लाख ६५ हजार कोटी एवढे झाले आहे. यात जवळपास तिपटीने वाढ झाली

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# खिसा आपला, नफा बँकेचा

भारतातील सरकारी बँकांमध्ये ११ बँका आहेत. विशेष म्हणजे या बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया नाही. ती १२ वी सरकारी बँक असून, सर्वात मोठी आहे. इतर सर्व ११ बँकांच्या बरोबरीची कदाचित स्टेट बँक एकटीच असावी. या बाराही बँकांचे दंडवसुलीचे सारखेच नियम आहेत. काही वर्षांपासून 'मिनिमम बॅलन्स', 'आवश्यक किमान शिल्लक रक्कम' नसल्यास या बँकांनी आपल्या ग्राहकाला, खातेदाराला दंड ठोकण्याचा नियमच केला आहे. असा नियम करण्याची बँकांना गरज का भासली, या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर कधीच मिळाले नाही किंवा कोणा बँक कर्मचाऱ्याला सांगता आले नाही. मुळातच या सर्वच बँका चांगला नफा कमावत असल्याचेच दिसून आले आहे. मध्यंतरी यापैकी काही बँका अडचणीत आल्या होत्या. बँक हा एक व्यवसाय आहे. या व्यवसायाच्या काही गरजा आहेत. त्यांना ग्राहक सेवा द्यावी लागते, व्यवस्थापन खर्च करावा लागतो, ते नियमित उत्पन्नात भागत नसल्यामुळे हा शिल्लक किमान रकमेचा नियम आल्याचे सांगतात. तर दुसरीकडे, बँकांचा नफा थोडाफार कमी झाला तर बिघडते कुठे, असाही प्रश्न सामान्य ग्राहक विचारतो. आणखी एक महत्त्वाचा दंड बँका आकारत असतात, तो म्हणजे जास्तीचा एटीएम वापर. एटीएम या अतिशय सोयीस्कर अशा सुविधेचा वापर अनेकदा खातेदारच बेलगाम पद्धतीने करतो. ही सुविधा देण्यास बँकांना मोठा खर्च करावाच लागतो. ही एटीएम सुविधा किती, कशी, कुठे वापरल्यास किती पैसे लागतात हे बँकांनी आधीच सांगितले असते. त्यामुळे त्याचा वापर खातेदाराने त्या हिशेबाने करणे आणि त्यानुसार पैसे मोजण्याची तयारी अपेक्षित आहेच.

'किमान शिल्लक'च्या नियमातून स्टेट बँक सोडून या ११ बँकांनी २०२० ते २०२४ दरम्यान आपल्याच खातेदारांकडून तब्बल ८५०० कोटी रुपयांची दंडवसुली केली आहे. २०२३-२४ या एकाच वर्षातील वसुली २३२६ कोटी रुपये इतकी आहे. यात बडोदा बँक ३८६, बँक ऑफ इंडिया १९४, महाराष्ट्र बँक १२६, कॅनरा बँक २८४, सेंट्रल बँक १२८, इंडियन बँक ३६९, इंडियन ओव्हरसीज बँक ४, पंजाब अँण्ड सिंध बँक ३९, पंजाब नॅशनल बँक ६३३, युको बँक ३६ आणि युनियन बँक १२६ कोटी असा वाटा आहे. एकट्या स्टेट बँकेने २०१९-२० या आर्थिक वर्षात अशा दंडापोटी ६३३ कोटी रुपये वसूल केले आणि पुढे हा दंड घेणे २०२० पासून थांबवले. स्टेट बँकेने हा स्वागतार्ह निर्णय घेतला. पण इतर बँका तो का घेत नाहीत, हा प्रश्न सर्वसामान्य खातेदारांना सतावत असतो. या बँका तोट्यात नसतानाही केवळ नफा वाढविण्यासाठी ही दंड तरतूद गोंजारत असतात. २०१८ ते २०२३ या पाच वर्षांत या सर्व बँकांनी किमान शिल्लक आणि एटीएमचा अतिवापर या दोनच दंडांपोटी तब्बल ३५ हजार कोटी रुपये वसूल केले आहेत. ही आकडेवारी सरकारी ११-१२ बँकांचीच आहे. याशिवाय एचडीएफ, आयडीबीआय, अशा मोठ्या बँकांचे नियमही तसेच मोठे आणि महागडे आहेत. सध्या तर जगातील एक मोठी बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एचडीएफसी बँकेत तर म्हणे १० हजार रुपये शिल्लक ठेवावे लागतात. ती कमी झाली की दंडही आपोआपच संगणकीय पद्धतीने ठोकला जातो.

एटीएमचा अतिवापर एकवेळ समजू शकतो, पण किमान शिलकीवर दंड हा तर अयोग्य, अन्याय आणि बेकायदेशीरच आहे. या बँका विविध प्रकारच्या ७० ते ८० सेवांच्या नावावर पैसे वसूल करतात. त्यावर जीएसटीसारखा १८ टक्के करही खातेदारच देतो. यापैकी अनेक सेवा यापूर्वी विनाशुल्क होत्या. मग आताच ही वसुली कशासाठी, या प्रश्नाला कोणी विचारत नाही, की विचारल्यास कोणी उत्तर देत नाही. या सर्व सरकारी बँकांनी २०२३-२४ या वर्षात सुमारे १.५० लाख कोटींचा नफा कमावला आहे. १५ हजारांपेक्षा जास्त शाखा आणि २.५ लाखांवर कर्मचारी असलेल्या एकट्या स्टेट बँकेचा २०२३-२४ चा नफा ६७,०८५ कोटी रुपयांचा आहे. याशिवाय या साऱ्याच बँकांमध्ये असलेल्या कोणीच मायबाप दावा करत नसलेल्या रकमांचा तर हिशेबच नाही. असे असतानाही नकळतपणे, कधी कधी काहीही संबंध नसताना 'सायबर भामटे' सर्वसामान्यांच्या खात्यातून पैसे उडवतात तेव्हा या बँका काय करतात? काही नशीबवान आणि हुशार खातेदार सोडले तर अशा लुबाडल्या गेलेल्या खातेदारांकडे त्या दुर्लक्ष करतात. त्यांच्या तक्रारींची दखलच घेत नाहीत. कधी काही महिन्यांनी, पाठपुरावा केल्यास 'प्रतिसाद' देऊन तुमची तक्रार किंवा 'डिस्प्युट' आम्ही अमुक कारणासाठी नाकारल्याचे 'स्टिरिओटाईप' छापील उत्तर देऊन मोकळे होतात. उलटपक्षी, स्टेट बँकेने तर १ लाखापर्यंतची 'उडवली' गेलेली रक्कम त्या खातेदाराला प्राथमिक खातरजमा करून कोणत्याही 'डिस्प्युट' विनाच परत देऊन टाकायला हवी. कारण या स्टेट बँकेचा सर्वसाधारण वार्षिक नफा आहे, ५० हजार कोटींपेक्षा जास्त..!

# ब्रम्हपुरी जिल्हा मागणीने पुन्हा जोर पकडला

## तीव्र आंदोलन करण्याचा बैठकीत निर्धार, गावोगावी समित्या स्थापन करणार

ब्रम्हपुरी/का.प्र.

सन १९८२ ला चंद्रपूर जिल्हयाचे विभाजन करून ब्रम्हपुरी जिल्हा घोषित करण्यात आला होता पण ऐन वेळी निर्णय बदलून गडचिरोली ला जिल्हा करण्यात आला होता. तेव्हापासून ब्रम्हपुरी वर अन्यायच होत आलेला आहे व त्यावेळेपासूनच पुन्हा ब्रम्हपुरी जिल्हा निर्माण करण्यासाठी ब्रम्हपुरीकरांचे प्रयत्न सुरू आहेत.



अशातच तीन वर्षांपूर्वी ब्रम्हपुरी जिल्हा निर्माण संघर्ष समितीची स्थापना झाली व ब्रम्हपुरी जिल्हा होण्यासाठी आतापर्यंत अनेक निवेदने, मोर्चे, चक्का जाम, रास्ता रोको, साखळी उपोषण , सामुहिक मुंडन कार्यक्रम, जि.आर.ची होळी, तत्कालीन उपमुख्यमंत्री फडणवीस साहेब यांची भेट असे प्रयत्न करण्यात आले परंतू अजून पावेतो शासनाने याची दखल घेतली नाही याकरीता १२९ जून ला संध्याकाळी ७ वाजता मान हरिश्चंद्रजी चोले यांचे अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृह येथे सभा घेण्यात आली.

सभेमध्ये सविस्तर चर्चा करून ठराव संमत करण्यात आले. ज्यामुळे ब्रम्हपुरी जिल्ह्याची मागणी तेवत राहील व शासनाला याची आठवण करून देण्यात येईल. सभेमध्ये जुलै महिन्यात शासनाला एक निवेदन देणे, मान मुख्यमंत्री, पालकमंत्री, मान. गडकरी साहेब यांची भेट घेऊन निवेदन देणे, विद्यमान आमदार मान. विजयभाऊ वडेट्टीवार यांची भेट घेऊन निवेदन देणे, माहे ऑगस्ट मध्ये एक विशाल मोर्चा काढणे , ग्रामीण भागात समित्या स्थापन करने, समितीच्या विविध आंदोलनाला लागणाऱ्या खर्चासाठी लोकांकडून निधी गोळा करणे त्याकरिता प्रत्येक कुटुंबातील प्रती सदस्य दहा रुपये गोळा करण्याचे ठरले.

सदर सभेला विनोद झोडगे, प्रशांत डांगे, दत्तू टिकले, सल्लागार राजू भागवत, सुधाकर पोपटे, प्रा. प्रकाश बगमारे , डॉ .राहूल मेश्राम, पत्रकार विजय रामटेके, अजय खडसिंगे, मिलिंद भनारे, दिपक मेहर, प्रमोद आसटकर, रक्षित रामटेके, सुनील विखार, पुष्पांकर बांगरे, अमोल मोटघरे हे उपस्थित होते.

सभेचे संचालन भागवत सर यांनी केले तर आभार प्रदर्शन दत्तू टिकले यांनी केले.

# भूमीगत गटार कामांमुळे शहरात चिखलाचे साम्राज्य

## महिलांकडून मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

ब्रम्हपुरी/का.प्र.

भूमिगत गटार लाईनच्या कामामुळे व्यंकटेश नगरी ब्रह्मपुरी येथील रोडवर निर्माण झालेल्या चिखलावर तात्काळ उपाययोजना करण्याकरिता व्यंकटेश नगरीतील महिलांनी न.प.च्या मुख्याधिकारी कार्यालयावर धडक दिली.



ब्रह्मपुरी शहरातील विविध प्रभागात सुरू असलेल्या भूमिगत गटार लाईनमुळे सर्व ठिकाणी रोडवर चिखल पसरलेला आहे. गीत पेट्रोल पंप मागील वेंकटेश नगरी येथे सिमेंट कॉंक्रीटचे रोड मधोमध फोडून गटार लाईन टाकण्यात आली. त्या भागातील माती ही शेत जमिनीची असल्याने ती माती रोडवर पसरली व सर्व रोड हे चिखलमय झाले. रोडवर चालताना भयानक परिस्थितीला तोंड द्यावे लागते. या समस्येवर उपाययोजना करण्याकरिता तसेच या भागातील नगर परिषदेचे पथदिवे हे आठवड्यातून चार ते पाच दिवस बंद असतात. वेंकटेश नगरी ब्रह्मपुरी येथील महिला ब्रम्हपुरी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांच्या दालनात जाऊन त्यांना आपल्या मागण्या त्यांनी पत्राद्वारे कळविल्या.

लेखी निवेदन देतांना मीनाक्षी भरडकर, धनलक्ष्मी वंजारी, अनिता भानारकर, भाग्यश्री पडोळे, प्रियंका झुरे, पुष्पा ढोरे, गीताश्री मुकुंदवार, ज्योती टिकले, रंजना लांजेवार, पुष्पा खरकाटे, मनीषा नाकतोडे उपस्थित होत्या.


आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...

: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर,
विद्यानगर, ब्रम्हपुरी

: जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३१००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७९५३९५


## विनोदिनी

पुण्यात नव्याने रहायला आलेली युपीची भाभी पुणेकर काकूंसोबत गप्पा मारत होती...

भाभी : बहन आप.. करवाचौथ का व्रत नाही रखती हो का...?

पुणेकर काकू: अगं वेडे... ऑलरेडी निवडून, चाळून, पाखडून घेतलेल्या नवऱ्याला परत परत चाळणीतुन काय बघायचे...?

# राजश्री शाहू महाराज हे रयतेचे खरे लोकराजे

## - प्राचार्य डॉ. शेकोकर



ब्रम्हपुरी/का.प्र.

'आपल्या देशातल्या जुन्या लोकरुढी, परंपरा बाजूला सारुन समता आणि बंधुता प्रस्थापित करणारे आणि दीन, दलित, शोषितांचे तारणहार, आरक्षणाचे जनक म्हणजे छत्रपती राजश्री शाहू महाराज होत. ते रयतेचे खरे लोकराजे होते ' असे बहुमोल विवेचन कार्य. प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकरांनी केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात छत्रपती राजश्री शाहू महाराज जयंतीनिमित्त बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपतींच्या फोटोला माल्यार्पण करून करण्यात आली. सर्वप्रथम प्राचार्य डॉ. शेकोकर, अधीक्षक संगीता ठाकरेंनी माल्यार्पण केले त्यावेळी जयघोष करण्यात आला. यानंतर उपस्थित डॉ. राजेंद्र डांगे, डॉ. रेखा मेश्राम, डॉ. असलम शेख, डॉ. धनराज खानोरकर, डॉ. मोहन कापगते, डॉ. रतन मेश्राम, डॉ. युवराज मेश्राम, डॉ. पद्माकर वानखडे, डॉ. अरविंद मुंगोले, डॉ. किशोर नाकतोडे, डॉ. कुलजित शर्मा, डॉ. हर्षा कानफाडे, डॉ. वर्षा चंदनशिवे, डॉ. राजू आदे, डॉ. अजित खाजगीवाले , पर्यवेक्षक प्रा. आनंद भोयर, प्रा. अजय खोब्रागडे, रोशन डांगे, जयंत महाजन, प्रज्ञा मेश्राम प्रतिमेला पुष्प वाहून आदरांजली वाहिली.

संचालन डॉ. युवराज मेश्राम यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. धिरज आतला यांनी केले. यशस्वीतेसाठी समिती प्रभारी डॉ. शर्मा, डॉ. खानोरकर, जगदिश गुरनुले, प्रदीप रामटेकेंनी सहकार्य केले.

# शेतीतील मोटारपंप चोरट्यास अटक

ब्रह्मपुरी/का.प्र.

शेतातून मोटारपंप चोरणाऱ्यास पोलिसांनी अटक केली आहे. सलमान सुलतान शेख असे चोराचे नाव आहे. त्याच्याकडून मोटारपंप जप्त करण्यात आले आहे.

ब्रम्हपुरी शहरातील पेठवॉर्ड येथील कैलास पिलारे यांची शेती गावाला लागूनच आहे. सध्या शेतीचा हंगाम सुरू आहे. ते मोटारपंप सुरू करण्यास गेले. मात्र, शेतात मोटारपंप दिसून आली नाही. शेजारील शेतकरी रवी प्रधान, हरबाजी प्रधान यांच्या शेतातील मोटारपंपही दिसून आल्या नाही. तिघांनी पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांच्या डीबी पथकाने तपास सुरू केला. सलमान सुलतान शेख हा मोटारपंप चोरी करीत असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्याला पथकाने ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीत त्याने मोटारपंप चोरल्याची कबुली दिली.

त्याने चोरी केलेले मोटारपंप कुर्झा वॉर्डातील एका पडक्या घरात लपवून ठेवल्या होत्या. तेथून तिन्ही मोटारपंप पोलिसांनी ताब्यात घेतल्या. त्याची किंमत १२ हजार रुपये आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक मनोज खडसे, योगेश शिवणकर, अजय कटाईत, मुकेश गजबे, स्वप्निल पळसपगार, चंदू कुळसंगे, इरशाद खान, नीलेश तुमसरे यांनी केली.

# ब्रम्हपुरीतील निर्माणाधीन ई-लायब्ररीची आम. वडेट्टीवारांकडून पाहणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहराची विदर्भात शिक्षणाची पंढरी म्हणून विशेष ओळख आहे. महाराष्ट्र विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते, विधीमंडळ काँग्रेस गटनेते तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार यांच्या विशेष प्रयत्नांतुन ब्रम्हपुरी शहरात १० कोटी रुपये खर्चून ई-लायब्ररीचे बांधकाम सुरू असुन सदर बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. याठिकाणी आमदार विजय वडेट्टीवारांनी भेट देऊन बांधकामाची पाहणी केली. सोबतच लायब्ररीमध्ये दर्जेदार फर्निचर व इतर सोयीसुविधा




सुयोग्य पद्धतीने करण्याच्या सुचना बांधकाम विभागाच्या अभियंत्यांना दिल्या. येत्या दोन महिन्यांत ई-लायब्ररी विद्यार्थ्यांच्या विद्यार्थ्यांसाठी खुली केली जाणार आहे.

सदर ई-लायब्ररी ही विदर्भातील सर्वांत मोठी ई-लायब्ररी असुन यामध्ये जवळपास २०० विद्यार्थ्यांची आसन क्षमता असणार आहे. तर ५० विद्यार्थ्यांसाठी संगणकीय प्रणालीने तंत्रज्ञानयुक्त बैठक व्यवस्थेसोबतच ही लायब्ररी आयआयटी खडगपुर सोबत ऑनलाईन कनेक्ट असणार आहे. सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांची पुस्तके याठिकाणी उपलब्ध असणार आहेत. मुला-मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय याठिकाणी करण्यात येणार आहे. पुर्णतः वातानुकूलित यंत्रणा बसवली गेली आहे. सोबतच याठिकाणी विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व मार्गदर्शनासाठी प्रशस्त मोठे हॉल देखील बनविण्यात आले आहेत.

मतदारसंघातील ब्रम्हपुरी हे शहर विद्येचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध आहे. सर्व प्रकारचे शिक्षण उपलब्ध असलेली अनेक शाळा-महाविद्यालये या शहरात असल्याने मतदारसंघासह आजुबाजूच्या परिसरातील विद्यार्थी याठिकाणी शिक्षणासाठी येत असतात. मतदारसंघात अधिकाधिक प्रशासकीय अधिकारी घडवून शैक्षणिक क्रांती घडविण्याचा मानस आहे. म्हणूनच सदर ई-लायब्ररी मंजूर करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. त्या प्रयत्नांना यश मिळाले. ई लायब्ररीचे बांधकाम पुर्ण झाले असून लवकरच विद्यार्थ्यांसाठी खुली केली जाणार असल्याचे मत यावेळी आम. विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केले.

# कोसंबी (ग) आश्रमशाळेत प्रवेशोत्सव व पालक मेळावा

नागभीड/प्रतिनिधी

विद्यार्थ्यांचा शाळेचा पहिला दिवस आनंददायी होऊन शाळेची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने शासकीय माध्यमिक आश्रम शाळा कोसंबी गवळी ता. नागभीड येथे दिनांक २७ जून २०२५ रोज शुक्रवारला प्रवेशोत्सव व पालक मेळावा चे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन नरेंद्र कावळे (सहाय्यक प्रकल्प अधिकारी शिक्षण) यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भैय्याजी दडमल (अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती) हे होते. दयारामजी कन्नाके (आदिवासी समाज सेवक), संजय गजपुरे, सरपंच दिलीपजी रंदये कोसंबी गवळी यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक पी.एस. भांडारकर यांनी केले. दहावी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविलेल्या कु. संजीवनी चौधरी, द्वितीय लक्ष्मी भैय्याजी दडमल, तृतीय शितल संभाजी दडमल विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कु. कांचन गायकवाड हिचा बायटर माईंड उपक्रमासाठी सत्कार करण्यात आला तसेच एकलव्य शाळेकरिता निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले. नंतर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सिकलसेल तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. तसेच ॲस्ट्रॉनॉमी सायन्स लॅब चे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन कु श्रीरामे मॅडम व आभार प्रदर्शन डोंगरे सर यांनी केले.

# रणमोचन येथील जि.प. शाळेत खास. किरसान यांचेकडून नोटबुकचे वितरण



ब्रह्मपुरी/का.प्र.

गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार नामदेव कीरसान यांच्या तर्फे रणमोचन येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते पाचवीत शिक्षण घेणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना सोमवार दिनांक १ जुलै २०२५ रोजी शाळेत नोटबुकचे वितरण करण्यात आले.

नोटबुक वितरणप्रसंगी रणमोचन येथील तंमुसचे माजी अध्यक्ष तथा काँग्रेस कार्यकर्ते विलास मेश्राम, ग्राम काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य संजय प्रधान, युवक ग्राम काँग्रेस कमिटी अध्यक्ष संदीप मांदाडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रेशम शेंभरकर, शाळेचे मुख्याध्यापक संजय झुरमुरे, शिक्षक नरेंद्र आंबोरकर, कृष्णा किरमिरे, काशिनाथ हेडाऊ, घनश्याम बोधे सर, प्रीती बालपांडे, शैला राऊत मॅडम यांचेसह विद्यार्थी उपस्थित होते.

# शहरातील राष्ट्रीय महामार्गावरील चुकीचे नाली बांधकाम थांबविण्याचे आमदारांचे आदेश

## भुतीनाला पुलाचे बांधकाम, रेल्वे उड्डाणपूल बांधकामांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना सुचना



ब्रम्हपूरी/का.प्र.

शहरातील खिस्तानंद चौक पासून नवेगाव मक्ता या गावापर्यंत राष्ट्रीय महामार्ग रस्त्याचे रुंदीकरणाचे काम सुरू आहे. सध्यस्थितीत याठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या नाल्यांचे बांधकाम सुरू आहे. हे बांधकाम पुर्णतः चुकीच्या पध्दतीने सुरू आहे. त्यामुळे सदर बांधकामाच्या ठिकाणी माजी विरोधी पक्षनेते, विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते, तथा ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी स्वतः प्रत्यक्षरित्या भेट देऊन बांधकामाची पाहणी केली व चुकीच्या पद्धतीने सुरू असलेले हे बांधकाम थांबविण्याचे आदेश देखील त्यांनी महामार्ग विभागाच्या अभियंत्यांना दिले.

ब्रम्हपूरी शहरातुन वडसा कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला नवीन नालीचे बांधकाम सुरू आहे. सदर नाली ही रस्त्यापेक्षा उंच असल्याने रस्त्यावरील पाणी नालीत जाऊ शकणार नाही. परिणामी पाणी वाहून जाण्याकरीता बांधण्यात आलेली नाली फक्त शोभेची ठरणार. व पाऊसाचे पाणी रस्त्यांवर साचुन नागरिकांच्या घरात व व्यावसायिकांच्या दुकानात पाणी घुसणार. या सर्व बाबींमुळे ब्रम्हपूरी शहरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागणार याची जाणीव ठेवत आमदार विजय वडेट्टीवार यांनी निर्माणाधीन असलेल्या नालीच्या बांधकामाची पाहणी करून नाल्यांचे बांधकाम बंद करण्याचे आदेश दिले.

सोबतच ब्रम्हपूरी-वडसा रस्त्यावरील भुतीनाल्यावर पुल बांधकाम सुरू आहे. सदर पुल बांधकामाच्या ठिकाणी आमदार विजय वडेट्टीवारांनी भेट देऊन पाहणी केली. पुलाचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करून १५ दिवसांत पुल वाहतुकीसाठी मोकळा करण्यात यावा व पर्यायी रस्ता म्हणून तयार करण्यात आलेल्या रस्त्याची व्यवस्थित डागडुजी करण्याचे निर्देश त्यांनी उपस्थित राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. तसेच ब्रम्हपूरी-आरमोरी रस्त्यावरील रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूलाचे बांधकाम सुरू आहे. या ठिकाणी देखील आमदार विजय वडेट्टीवार यांनी भेट देऊन पाहणी केली. रेल्वे क्रॉसिंगच्या दोन्ही बाजूला असलेल्या गतिरोधकांची उंची कमी करावी व खड्डे पडलेल्या ठिकाणी डागडुजी करण्यात यावी, असे आदेश त्यांनी बांधकाम विभाग अभियंता अजय चहांदे यांना दिले.

# कृषीगंगा पाणी वापर संस्थेची हंगामी आमसभा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

कृषीगंगा पाणी वापर संस्था गांगलवाडीची हंगामी मासिक सभा व हंगामी आमसभा दिनांक २८ जून रोज शनिवारला दुपारी १ वाजता संस्थेचे अध्यक्ष प्रा. रामलाल दोनाडकर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी गोसेखुर्द उजवा कालवा विभाग ब्रम्हपूरी उपविभाग क्र.८चे विजय गिरासे साहेब, सहाय्यक अभियंता श्रेणी- २ विनोद वाघाडे, शुभम प्रधान फिल्ड को-ऑर्डिनेटर गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांचेसह संचालक मंडळातील राजेश्वर मगरे, सहदेव दोनाडकर, बाजीराव अलोने, गजानन मैंद, वनिता दोनाडकर,



ढोरे, संस्थेचे सचिव सूरज दोनाडकर आणि नंदकिशोर दोनाडकर अध्यक्ष पाणी वापर संस्था बरडकिन्ही, मनोहर मिसार सचिव पाणी वापर संस्था बरडकिन्ही, सुनील दोनाडकर, टिकाराम माकडे, रवींद्र मैंद, पत्रकार गुलाब ठाकरे व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सभेत अनेक विषयांवर चर्चा झाली. उपस्थित शेतकरी आणि पाणी वापर संस्थेचे संचालक मंडळांनी यंत्रणे विषयी विविध प्रश्न विचारून समाधान करून घेतले. यामध्ये नवीन पाईपलाईन बद्दल काही समस्या असल्यास कळवावे, शेतकरी सदस्य नोंदणी करण्यास सुरुवात करावी, पाणीपट्टी कशी आकारावी याबद्दलची माहिती, संस्थेचे कार्यालय आद्यावत करण्याबाबतच्या सूचना, यावर्षीच्या हंगामात पाणी सोडण्याच्या प्रक्रियेवर भर, यासह अनेक विषयांवर सर्वंकष चर्चा झाली. तद्वतच विजय गिरासे यांनी काही मार्गदर्शक सूचना संस्थेच्या संचालक मंडळाला दिल्या. उपस्थित सर्वांचे आभार संस्थेचे अध्यक्ष रामलाल दोनाडकर यांनी मानले.

# महाराष्ट्र इंस्टिट्युट ऑफ फार्मसी येथे छत्रपती शाहू महाराज जयंती संपन्न



ब्रम्हपुरी/का.प्र.

दि.२६जून २०२५ ला महाविद्यालयात छत्रपती शाहू महाराज यांची १५१वी जयंती साजरी करण्यात आली. या वेळेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन दुधे यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला फुले व पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या वेळेस राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन, आय.क्यू.ए.सी. इन्चार्ज प्रा.डॉ. अनुप बारसागडे, प्रा. डॉ. सुहास साकरकर, प्रा. पृथ्वीराज मेश्राम, प्रा. छगन डोईजड, प्रा.चेतन चौधरी, प्रा.कु सविता वसाके, प्रा.कु पूजा घुटके, प्रा.कु अश्विनी भुकिया, प्रा.कु प्राची मांडवे व इतर प्राध्यापक गण तसेच शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी प्रा.श्रीकांत महाजन यांनी शाहू महाराजांनी समाज सुधारणेसाठी केलेल्या अनेक कामासाठी ते कसे संपूर्ण महाराष्ट्राचे विकासात्मक समाजनिर्मितीचे प्रेरणा स्तोत्र व अधिष्ठाता ठरले यावर प्रकाश टाकला.

# मनोज भुपाल यांनी मानले प्रा. देशकर यांचे आभार

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी शहरातील खिस्तानंद चौक ते वडसा रोडच्या रुंदीकरणाचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) च्या वतीने सुरू आहे. या ठिकाणी ठेकेदाराकडून या तलावाचा नैसर्गिक सलंग नाली उंच करून बंद करण्यात आला होता. तलावातील पाणी पातळी वाढल्यावर या सलंग मधून पाणी जात होते. सलंग बंद झाल्याने तलावातून पाणी बाहेर निघण्याचा मार्ग बंद झाला. पावसाळ्यात तलावातील पाणीसाठ्यात वाढ होऊन तलाव लवकर फुटण्याचा धोका वाढला होता . या बाबत बारई समाजाच्या वतीने समाजाचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक मनोज भुपाल यांनी माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांना निवेदन देऊन यावर तोडगा काढण्याची विनंती केली होती. यानंतर माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांनी प्रत्यक्ष या बांधकामाची पाहणी केली होती. या नंतर प्रा. देशकर



यांनी तोडगा निघेपर्यंत काम थांबविण्याची विनंती केली होती. काही दिवस काम बंद होते.

ब्रह्मपुरी येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांनी उच्चस्तरीय बैठक घेतली होती. यामधे तोडगा काढण्याबाबत चर्चा झाली होती. अखेर माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांची शिष्टाई यशस्वी झाली आहे. अधिकाऱ्यांनी सद्यस्थित बांधकाम तोडून खोल नालीचे बांधकाम रस्त्याच्या दुतर्फा करण्याचे आदेश राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदाराला दिले आहेत. नवीन बांधकामामध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजूस खोल नाल्या करण्यात येणार असून बारई तलावाचा सलंग पूर्वी सारखाच ठेवण्यात येणार आहे. सोबतच शेष नगर कडील नालीमधे येणाऱ्या बारई तलावाच्या कडेला काँक्रेटच्या भिंतीचे बांधकाम करण्यात येणार आहे. यामुळे शेष नगरातील पाणी व बराई तलावाचे पाणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) च्या मुख्य नालीतून विसर्ग होणार आहे.

यामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे. माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या पुढाकारामुळे तोडगा निघाला असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. यासाठी बारई समाजाचे अध्यक्ष माजी नगरसेवक मनोज भुपाल यांनी प्रा. देशकर यांचे आभार मानले.

# कृत्रिम तारूण्याचा मोह जीवाशी



वाढत्या वयाला थांबवून चिरतरुण दिसण्याची इच्छा आजकाल अनेकांना भुरळ घालत आहे. याच इच्छेपोटी अँटी-एजिंग क्रीम्स, गोळ्या आणि विविध औषधांचा बाजार मोठ्या प्रमाणात विस्तारला आहे. जाहिरातींमध्ये दाखवल्या जाणाऱ्या चमत्कारी परिणामांमुळे अनेकजण या उत्पादनांकडे आकर्षित होतात. मात्र, तारुण्याच्या या मोहाची एक काळी बाजूदेखील आहे, ज्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय अशा औषधांचा वापर शरीरावर गंभीर आणि कायमस्वरूपी दुष्परिणाम करू शकतो, असा इशारा आरोग्यतज्ज्ञांनी दिला आहे. अभिनेत्री शेफाली जरीवाला हिचा मृत्यूही अँटी एजिंग इंजेक्शन आणि औषधांमुळे झाल्याचे बोलले जाते. या पार्श्वभूमीवर कथित तारुण्यसुलभता वाढविणाऱ्या औषधांविषयी थोडक्यात माहिती...

### काय आहेत धोके ?

त्वचारोग तज्ज्ञांच्या मते तरुण दिसण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक औषधांमध्ये स्टिरॉईडस्, हार्मोन्स आणि काही अज्ञात रासायनिक घटकांचा वापर केला जातो. सुरुवातीला याचे चांगले परिणाम दिसतात; पण दीर्घकाळ वापरामुळे शरीराचे अंतर्गत संतुलन पूर्णपणे बिघडू शकते.

### एका तरुणाचा अनुभव :

एका ३८ वर्षीय सॉफ्टवेअर इंजिनिअरने चेहऱ्यावर तेज आणि उत्साह टिकवण्यासाठी ऑनलाईन जाहिरात पाहून अँटी-एजिंग गोळ्यांचे सेवन सुरू केले. सुरवातीला त्यांना खूप ताजेतवाने वाटले; पण तीन महिन्यांनंतर त्यांच्या चेहऱ्यावर विचित्र डाग येऊ लागले. किडनीच्या कार्यात समस्या निर्माण झाली आणि हार्मोन्सच्या असंतुलनामुळे त्यांना नैराश्याचा सामना करावा लागला. अखेर डॉक्टरांकडे धाव घेतल्यानंतर त्यांना समजले की, या गोळ्यांमधील अज्ञात घटकांमुळे त्यांच्या शरीरावर विषारी परिणाम झाला होता.

### तज्ज्ञांचा सल्ला :

कोणतेही अँटी-एजिंग औषध किंवा उपचार घेण्यापूर्वी त्वचारोग तज्ज्ञांचा सल्ला घेणे अनिवार्य आहे. ऑनलाईन किंवा अनधिकृत स्रोतांकडून औषधे विकत घेणे म्हणजे स्वतःच्या आरोग्याशी खेळण्यासारखे आहे. नैसर्गिकरीत्या वृद्ध होणे, ही एक सामान्य प्रक्रिया आहे. योग्य आहार, नियमित व्यायाम आणि तणावमुक्त जीवनशैली हाच तारुण्य टिकवण्याचा सुरक्षित आणि प्रभावी मार्ग आहे.

## अँटी-एजिंग औषधांचे संभाव्य गंभीर दुष्परिणाम

**त्वचेचे नुकसान :** त्वचेवर पुरळ येणे, त्वचा पातळ होणे, कायमस्वरूपी डाग पडणे किंवा त्वचेचा कर्करोग होण्याचा धोका.

**हार्मोन्सचे असंतुलन :** शरीरातील नैसर्गिक हार्मोन्सच्या कार्यात अडथळा निर्माण होऊन थायरॉईड, वंध्यत्व किंवा लैंगिक समस्या उद्भवू शकतात.

**किडनी, यकृतावर परिणाम :** अनेक औषधांमधील रासायनिक घटक शरीराबाहेर टाकण्याचे काम किडनी आणि यकृत करतात. यांच्या अतिवापरामुळे या महत्त्वाच्या अवयवांच्या कार्यक्षमतेवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

**मानसिक परिणाम :** काही औषधांमुळे चिंता, नैराश्य आणि मानसिक अवलंबित्व वाढू शकते.

**ॲलर्जी :** औषधांमधील घटकांची तीव्र ॲलर्जी होऊन जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.

# माजी विद्यार्थी स्नेहमिलन तथा गुरूजनांचा सत्कार कार्यक्रम

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात १९९२-




९३ ला १० व्या वर्गात शिकत असणारे विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले त्यामुळे ३२ वर्षानंतर वर्गमित्र एकत्र आले. यावेळी ज्या शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे पुढील आयुष्यात वाटचालीत सदैव मदत झाली, त्यांच्या ऋणाची परतफेड म्हणून त्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. राजेश कांबळे उपाध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था चांदा ब्रम्हपुरी हे उपस्थित होते तर प्रमुख उपस्थिती माजी मुख्याध्यापक रंजना भुते, डी.डी.ताजने, दिपक धनवीजय, डॉ. मिलिंद रंगारी, गुलाब हनवते, टि.जी.चाचरकर, जेष्ठ शिक्षक पी.जी.गणविर, धोंडबाजी सुखदेवे, कौशल्या मोटघरे, चंद्रमणी डांगे, मुनेश्वर सुर्यवंशी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात 'माणसाने माणसासी माणसासारखे वागणे' ही प्रार्थना घेऊन केली. माजी विद्यार्थ्यांनी आपला परिचय देऊन विविध क्षेत्रात कार्यरत असल्याचा परिचय करून दिला. प्रमुख मार्गदर्शन डॉ. मिलिंद रंगारी, भुते मॅडम, रामटेके मॅडम यांनी केले.

सुत्रसंचालन मनोरंजन धोगंडे यांनी तर आभार प्रदर्शन शरद शेंडे यांनी केले.

# ब्रम्हपुरीचे झाले चिखलगांव...

(पान क्र. १ वरून)

निचरा कसा होईल, असा प्रश्न निर्माण झाला आहे. ले-आऊटमधील नाल्यांचा तळ व निर्माणाधिन राष्ट्रीय मार्गावरील नाल्यांचा तळ यामध्ये एक फूटापेक्षा अधिक फरक आहे. परिणामी, सांडपाण्याचा निचरा होणार नाही व घाण पाणी ले-आऊट परिसरात साचून सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण होईल. मच्छरांचा सुळसुळाट होऊन मलेरियासारखे रोख नागरिकांना बाधित करण्याची शक्यता आहे.ब्रम्हपुरी शहराचा विद्यानगरी, वैद्यकीय नगरी, क्रिडानगरी, सांस्कृतिक नगरी असा सर्वत्र नावलौकीक आहे. नगर परिषदेच्या ढिसाळ नियोजनामुळे ब्रम्हपुरी शहराला बट्टा लागला आहे. ब्रम्हपुरीचे नामकरण आता "चिखलगांव" असे तर होणार नाही!

या समस्येबाबत लोकप्रतिनिधी देखील उदासीन आहेत. राजकीय नेत्यांनी राष्ट्रीय मार्गाच्या चुकीच्या बांधकामाची दखल घेतली परंतु भूमीगत गटार योजनेमुळे रस्ते चिखलमय झाल्याची बाब त्यांच्या लक्षात कां आली नाही, हा मात्र प्रश्नच आहे.

# जि.प. शाळा तुलान माल येथे छत्रपती शाहू महाराज जयंती

ब्रम्हपुरी/का.प्र.

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तुलान माल व सत्यशोधक सार्वजनिक वाचनालय तुलान माल यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती तथा गुणवंत विद्यार्थी सत्कार आणि करिअर मार्गदर्शन या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा परिषद शाळेत करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रतिभाताई ठाकरे,चंद्रपूर पोलिस होत्या. प्रमुख अतिथी म्हणून राजकुमार कुतरमारे,माजी पोलिस निरीक्षक प्रल्हाद ,कालिदास ठाकरे, संजय हनवते, विजय कुंभारे, जगदीश मेहेर, अशोक नागोसे, टीकाराम बोकडे, चंद्रशेखर चौधरी, निलिमा यावलकर, डाकरे बगळे, करिअर मार्गदर्शन करण्यासाठी अनिरुद्ध भर्रे पोलिस पाटील धामणगाव, योगेश निकुरे, मेश्रामताई, जिजाबाई बगळे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम गावातून प्रबोधन रॅली काढण्यात आली. मार्गदर्शकानी शाहू महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमात प्रतिभाताई ठाकरे, रेशमाताई कार, राजकुमार कुतरमारे, नंदलालजी पिल्लारे,पूनम कासारे, संजीवनी चौधरी, सानिया हानवाटे, नामदेव नाकतोडे यांना विविध पुरस्काराने मान्यवरच्या हस्ते गौरविण्यात आले. संचालन संघपाल चहांडे, प्रास्ताविक तन्मय हानवाटे, तर आभार प्रदर्शन पूजा बगमारे हिने केले.

## ... QUOTES ...



"Let me define a leader. He must have vision and passion and not be afraid of any problem. Insted, he should know how to defeat it. Most importantly, he must work with integrity."

- Dr. APJ Abdul Kalam

## चारोळी

मुठीत धरलं तरी
पाणी नाही थांबत...
नाक पुसलं तरी,
सर्दी नाही बसत...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एल.एम.बी. पब्लिक स्कुलमध्ये नवीन शैक्षणिक सत्राची उत्साहात सुरूवात



ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. २३ जुन २०२५ सोमवारला एल.एम.बी. पब्लिक स्कुलमध्ये शाळेचा पहिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. दोन महिन्याच्या उन्हाळयाच्या सुट्या संपून शाळेच्या पहिल्या दिवशी नवीन आशा नवीन उमंग घेऊन हसत खेळत विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश केला.

यावेळी सर्व शिक्षकांनी अतिशय सुबकतेने शाळेचे सुशोभीकरण करून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. मुख्य प्रवेशद्वाराजवळ स्वागत फलक वेलकम तोरण, फुग्यांची सजावट केली होती. स्वागत फलकावर विद्यार्थ्यांचा मनोबल वाढविण्यासाठी तसेच त्यांना शाळेविषयी आवड निर्माण करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम घेऊन शिक्षकांकडून विद्यार्थ्यांचा परिचय त्याचप्रमाणे शाळेचा परिसर यावर हितगुज करण्यात आले. त्यानंतर मुख्याध्यापक सरांनी शाळेविषयी काटेकोर नियमाचे पालन कसे करावे याबद्दल मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक सत्राच्या शुभेच्छा दिल्या.

अशा प्रकारे २०२५-२६ शैक्षणिक सत्राच्या सुरूवातीला विद्यार्थ्यांनी नवी स्वप्न घेऊन शाळेत प्रवेश केला. सर्व एल.एम.बी. एज्युकेटर्सनी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# संततधार पावसाने भूती नाल्यावरील रपटा वाहून गेला



ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील मागील दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे. दरम्यान, आन्हेर नवरगाव व कुर्झादरम्यानच्या भूती नाल्यावर तयार केलेला तात्पुरता रपटा वाहून गेला. या नाल्यावरील पुलाचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याने हा रपटा बांधला होता. मात्र, सोमवारी रात्री झालेल्या जोरदार पावसामुळे नाल्याला पूर येऊन रपटा वाहून गेला. त्यामुळे या मार्गावरून वाहतूक पूर्णतः ठप्प झाली आहे. या पावसामुळे तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

तालुक्यात मागील दोन दिवसांपासून परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पावसामुळे शहरातील गडर लाईनसाठी पूर्वी खोदण्यात आलेले आणि नंतर केवळ तात्पुरते बुजवलेले रस्ते चिखलामध्ये परावर्तीत झाले आहेत. परिणामी, नागरिकांना रस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहे. जून महिन्याच्या अखेरीस व जुलै प्रारंभी झालेल्या सततच्या पावसामुळे भूती नाल्यावरील वाहून गेलेला रपटा या पावसामुळे खरीप हंगामातील धानपीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना मात्र दिलासा मिळण्याऐवजी चिंता वाढली आहे. सध्या पेरणी पूर्ण होऊन धान उगवण्यास सुरुवात झाली असली, तरीही दिलासादायक पाऊस बरसलेला नाही. ब्रह्मपुरी-वडसा मार्गावरील पुलामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

❀❀❀❀❀❀

# ब्रम्हपुरी तालुका काँग्रेसची नवीन कार्यकारिणी जाहीर

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार नुकतीच जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सुभाष धोटे यांनी ब्रम्हपुरी तालुका काँग्रेस कमिटीच्या कार्यकारिणीची घोषणा केली. या कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी खेमराज तिडके यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली.

कोषाध्यक्ष पदी अतुल मिसार, उपाध्यक्ष म्हणून वामन मिसार, सुरेश ठिकरे, ईश्वर ठाकरे, नेताजी पिसे, हरिश्चंद्र गेडाम यांची, सरचिटणिस पदावर प्रशांत बगमारे, गुरूदेव वाघरे, अणा ठाकरे, विलास मेश्राम, राजू राऊत यांची सचिव पदावर संदिप बगमारे, अनिल कामडी, योगेश ढोरे, जगदिश नाकतोडे, मनोज कावळे तर सदस्य पदी संजय राऊत, दिवाकर मातेरे, ब्रम्हदेव दिघोरे, अरूण अलोने, किशोर राऊत, प्रमोद मोटघरे, शिवाजी दाणी, ज्ञानेश्वर झरकर, राजेश तलमले, प्रेमानंद मेश्राम व कपील राऊत यांची निवड करण्यात आली.

सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी

रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विषमतामुक्त...

(पान क्र. ९ वरून)

आहे. महाराष्ट्रात २०१३-१४ पर्यंत दरडोई उत्पन्न मात्र १ लाख २५ हजार इतके होते. आज दरडोई उत्पन्न २ लाख ७७ हजार एवढे आहे. काँग्रेसच्या ५७ वर्षात महाराष्ट्रात ४७६६ किमीचे राष्ट्रीय महामार्ग होते. ११ वर्षाच्या काळात १८,३६६ किमीचे राष्ट्रीय महामार्ग झाले. मोदींनी स्वच्छता अभियान अंतर्गत १२ कोटी शौचालये बांधली. आपण युध्दसामुग्री क्षेत्रात जवळपास स्वयंपूर्ण झालो आहोत.

आयात कमी होऊन निर्यात वाढली आहे. अनुसंधान क्षेत्रात भारताने आघाडी घेतली आहे. पूर्वी पेटंटची संख्या जवळपास ७ हजार इतकी होती. आता ही संख्या ७५ हजाराच्या वर पोहोचली आहे. डॉ. आंबेडकर यांचे महू, चैत्यभूमी, दीक्षाभूमी, लंडनचे निवासस्थान तथा महाड विकसित केले. आयुष्यमान भारत योजनेच्या माध्यमातून गरिबांना आरोग्यविषयक दिलासा दिला. एम्सच्या संख्येत वाढ झाली. वैद्यकीय महाविद्यालयांची संख्यासुध्दा वाढली. चंद्रपुरला सैनिक शाळा मिळाली. चंद्रपुर जिल्ह्याने वाघाचा जिल्हा म्हणून ओळख निर्माण केली. पूर्वी ११२ वाघ होते. वनमंत्री झाल्यानंतर ही संख्या ६०० पर्यंत झाली आहे. चंद्रपुरला कॅन्सर हॉस्पिटलचे निर्माण झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्राच्या विकासाकरीता तसेच शेतकरी, शेतमजूर, महिला, युवा, गरीब तथा उपेक्षित घटकांच्या कल्याणाकरीता अविरत कार्यरत असल्याचे आम. मुनगंटीवार यांनी अधोरेखित केले.


बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404